जा.क्र.नामनपा/सकवि/कार्या-१/ ६७ /२०१८

नाशिक महानगरपालिका,नाशिक

दिनांक : १६ /०८/२०१८

# प्रशासकिय मान्यता आदेश

विषय:- नाशिक महानगरपालिका हद्दीतील अंध,अपंग/दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविणे बाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि २० दि.२८/१०/२०१५

२) शासन निर्णय क्र.अपंग-२०१५/प्र.क्र.१३७/वित्त-३ दि.२४/११/२०१५

३) महासभा ठराव क्र. २० दिनांक १९/०७/२०१८

संदर्भातील क्र. १ व २ चे शासन निर्णयात अंध व अपंगाकरीता उपलब्ध करुन दयावयाच्या सोयी सुविधा व सहाय्य करण्याच्या तरतुदीबाबत मार्गदर्शक तत्वे नमुद करण्यात आलेली असून ती मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन जा.क्र. स.क.वि./नस/०६/२०१८ दि.२४/०५/२०१८ अन्वये सविस्तर प्रस्ताव/डॉकेट तयार करून महासभेच्या प्रशासकिय व धोरणात्मक मंजुरीसाठी ठेवला असता सदरच्या प्रस्तावास महासभा ठराव क्र.२० दिनांक १९/०७/२०१८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

संदर्भातील क्र.१ व २ चे शासन निर्णय तसेच संदर्भातील क्र.३ चा ठराव विचारात घेऊन नाशिक महानगरपालिका हद्दीतील अंध, अपंग/दिव्यांगांसाठी खालिल प्रमाणे १ ते ८ पावेतोच्या कल्याणकारी योजना अटी/शर्तीस अधीन राहून कायम स्वरुपी/प्रत्येक वर्षी राबविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>दिव्यांगांच्या सर्व योजनांसाठी अटी व शर्ती</u>

१. नाशिक महानगर पालिका क्षेत्रात वास्तव्य करीत असलेबाबत वीजबील,मालमत्ता कर पावती, वास्तव्याचा करारनामा व कोणतेही दोन पुरावे सादर करावे.
२. आधार कार्ड तथा पावतीची छायांकित प्रत सादर करणे.
३. जन्माचा दाखला अथवा वयाचा पुरावा याबाबतची प्रमाणित (**Certified**) प्रत सादर करणे.
४. ० ते १८ वयोगटातील दिव्यांग मुलास कोणत्याही योजनेचा लाभ घेण्याकरीता त्यांचे पालक योजनेचा अर्ज सादर करतील.
५. बौद्धिकदष्टया अक्षम असणारी दिव्यांग मुले अथवा व्यक्तींकरिता त्यांचे पालक अथवा कायदयानुसार पालकत्व धारण केलेली व्यक्ती अर्ज सादर करतील.
६. अपंगत्वाचे प्रमाणपत्र याबाबतची छायांकित प्रत सादर करणे
७. ० ते ५ वयोगटातील विशेष मुलांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नसल्यास खाली नमुद केलेल्या संस्थेमधील तज्ञ व्यक्तीमार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र/ अहवाल ग्राहय धरण्यात येईल.
    - राष्ट्रीय विकलांग संस्था, बांद्रा (कर्णबधिर)
    - राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था, खारघर (मतिमंद, सेलेब्रल पाल्सी, गतिमंद, स्वमग्न)
    - नेत्रतज्ञ,संदर्भ रुग्णालय,नाशिक अथवा सिव्हील हॉस्पीटल,नाशिक (अंध)
    - अस्थीरोग तज्ञ,संदर्भ रुग्णालय,नाशिक अथवा सिव्हील हॉस्पीटल,नाशिक (अस्थीव्यंग)
    - नाशिक महानगरपालिका वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी, नाशिक
८ सदर आर्थिक वर्षात मधील योजनेचा लाभ मिळविण्याकरीता अर्जदारास इतर कोणत्याही शासकीय,निमशासकीय तसेच नाशिक मनपा मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग योजनेचा लाभ घेतला नाही किंवा घेणार नाही यास्वरुपाचे स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.
९ प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर परंतु संपूर्ण अर्ज व कागदपत्रांची पुर्णत: पूर्तता केल्यास त्या पात्र अर्जदारास लाभ देण्यात येईल.
१० एखाद्या पात्र अर्जदारासंबधित खोटे कागदपत्र जोडण्यात आले असे निदर्शनास आल्यास पात्र अर्ज अपात्र करण्याचे तथा संबधित लाभार्थ्यांवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना राहतील.

Scanned with CamScanner

योजना क्र. १: कर्णबधिरांना Cochlear Implant सर्जरीकरीता अर्थसहाय्य योजना.

कर्णबधिरत्व/कर्णदोष हे भाषावाढीसाठी व वाचा विकासासाठी अत्यंत अडचणीचे ठरते. भाषा व वाचा विकासासाठी बुद्धीइतकीच निरोगी कर्णेद्रियांची गरज असते. जन्मतः कर्णबधिर असलेली मुले आजूबाजूच्या वातावरणातील तसेच बोलण्याचा आवाज ऐकू न आल्यामुळे बोलू शकत नाहीत. त्यायोगे त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य व भावनिक नुकसान होते. ख़रेतर योग्य वेळेत म्हणजेच जन्मानंतर लगेच शक्य तितक्या लवकर वयाने (वय ० ते ३ वर्षे) निदान करून त्यांच्या कानावर Cochlear Implant सारखी शस्त्रक्रिया केल्यास आणि त्यासोबत ऐकण्या-बोलण्याचे प्रशिक्षण दिल्यास कर्णबधिर मुले इतर ऐकू येणा-या मुलांसारखेच शालेय शिक्षण घेऊ शकतात. सर्वसामान्य मुलासारखे बोलू शकतात. श्रवणदोष हा वेगवेगळ्या तीव्रतेचा असून जन्मतःच कर्णबधिरत्व आलेल्या मुलांना तीव्र ते अतितीव्र प्रमाणात कर्णबधिरत्व आलेले असते. अशावेळी श्रवणयंत्र वापरणे पुरेसे ठरत नाही. अशावेळी Cochlear Implant Surgery केल्यास त्यांना इतर मुलांइतकेच ऐकू येवू शकते. Cochlear Implant हे ऑपरेशन करून आंतरकर्णाच्या हाडाच्या पोकळीपर्यंत सोडले जाते. तेथे बाहेरच्या आवाजाचे इलेक्ट्रिक सिग्नलमध्ये रुपांतर करून नसे पर्यंत आवाज पोहोचविते.

त्या योगे मुले नेहमीसारखे ऐकू शकतात व श्रवणत्वाच्या प्रशिक्षणायोगे मुलांचा भाषा-वाचा विकास अधिक सोपा होतो. सदरची शस्त्रक्रिया करताना कर्णबधिरत्वाबाबतच्या योग्य त्या चाचण्या करूनच शस्त्रक्रिया होत असते. शस्त्रक्रियेसाठी एका रूग्णास किमान ७ ते १० लाख रुपये खर्च अपेक्षित असतो. याव्यतिरिक्त औषधोपचार, थेरपि, प्रशिक्षण व इतर चाचण्यांकरिता हा आवर्ती खर्च पालकांना करावा लागत असतो. ही खर्चिक शस्त्रक्रिया असल्यामुळे ब-याचदा कर्णबधिर व्यक्तींना त्यापासून वंचित रहावे लागते व त्याचा भाषा-वाचा विकास व शैक्षणिक विकास खुंटतो.

सदरची बाब लक्षात घेता कर्णबधिरांना Cochlear Implant सर्जरीसाठी आर्थिक सहाय्य देणे किंवा Cochler Implant Speech Processor outer device करिता आर्थिक सहाय्य अंतर्गत प्रत्येक पात्र अर्जदारास रुपये ३,००,०००/-(अक्षरी तीन लाख रुपये मात्र) तसेच Mapping,औषधोपचार, थेरपि, प्रशिक्षण व इतर चाचण्यांकरिता रुपये ५० हजार (अक्षरी पन्नास हजार रुपये मात्र) असे, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील पात्र कर्णबधिर अर्जदारास (लहानात लहान कर्णबधिर मुलास प्रथम प्राधान्य देऊन) आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

Cochlear Implant सर्जरीसाठी अर्थसहाय्य या योजनेचे अटी व शर्ती

(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

१. ज्या हॉस्पीटलमार्फत Cochlear Implant शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे त्या हॉस्पीटलच्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
२. सदरची योजना अर्जदाराच्या त्याच्या पूर्ण हयातीत एकदाच लाभ मिळेल.

योजना क्र. २: दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य योजना

अनेक दिव्यांग व्यक्ती बऱ्याचवेळा दिव्यांगत्वामुळे अथवा बिकट परिस्थीतीमुळे स्वतःचे शिक्षण पूर्ण करु शकत नाही किंवा शारिरीक मर्यादेमुळे नोकरी करु शकत नाही तसेच दिव्यांगाकरीता उपलब्ध असणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. अशावेळी एखाद्या लघुउद्योग सुरु करून दिव्यांग व्यक्ती स्वतःचा व कुटूंबाचा उदरनिर्वाह करु शकतात. परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे किंवा विविध कारणांमुळे त्यांना भांडवल उभे करणे अशक्य असते. याकारणास्तव अशा दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता आर्थिक सहाय्य अंतर्गत नाशिक मनपा क्षेत्रातील प्रत्येक पात्र अर्जदारास रुपये १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रुपये मात्र) चे मर्यादेत आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य या योजनेचे अटी व शर्ती

(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

Scanned with CamScanner

१. तहसीलदार,यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या उत्पन्नाचा दाखला
२. अर्जदाराने आपल्या व्यवसायाबाबत गुमास्ता परवाना सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. स्वयंरोजगाकरीता आर्थिक सहाय्य मिळण्याकरीता अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त असू नये.
४. अर्जदाराने सुरु करण्यात येणाऱ्या लघुउद्योगाचे संपूर्ण प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेकडून देण्यात येणाया विहीत नमुन्यामध्ये सादर करणे बंधनकारक आहे. त्यासोबत सुरु करण्यात येणाऱ्या लघुउद्योगामार्फत प्राप्त होणारे पुढील ०३ वर्षाचे उत्पन्नाचे अंदाजपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
५. सदरील प्राप्त झालेले आर्थिक सहाय्य हे केवळ सादर करण्यात येणाऱ्या लघुउद्योगाकरीताच वापरण्यात येईल असे स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.
६. स्वयंरोजगार सुरु करण्याकरीता नाशिक महानगरपालिके मार्फत लाभार्थ्यास कोणत्याही प्रकारचा भूखंड उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

## योजना क्र. ३: प्रौढ बेरोजगार दिव्यांगांना अर्थसहाय्य योजना

समाजातील प्रत्येक व्यक्ती संपूर्णः स्वावलंबी असावी ही मुलभुत संकल्पना आहे. परंतु नैसर्गिकरित्या आलेल्या शारिरीक मर्यादा व एक विशिष्ट मर्यादेपलिकडे न येणारे स्वावलंबत्व यामुळे कित्येक व्यक्तींना समाजामध्ये परावलंबी आयुष्य जगावे लागते. मुख्यत्वे बौद्धिकरित्या दिव्यांगत्व असणारे किंवा बहुदिव्यांगत्व असणा-या व्यक्ती नैसर्गिक मर्यादांमुळे अथक प्रयत्नांनतरही स्वतःचा चरितार्थ चालविण्याकरिता अधिकतर असमर्थ ठरतात. अशा व्यक्ती नोकरी अथवा स्वयंरोजगार करू शकत नाहीत. या सर्वांचा विचार करता अशा दिव्यांग व्यक्तींना प्रतिमाह रुपये २,०००/- (अक्षरी दोन हजार रुपये मात्र) प्रमाणे प्रतिवर्ष रुपये २४,०००/- (अक्षरी चोवीस हजार रुपये मात्र) आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

## प्रौढ बेरोजगार दिव्यांगांना अर्थसहाय्य योजना योजनेचे अटी व शर्ती

(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

१. तहसीलदार,यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या उत्पन्नाचा दाखला या अर्जासोबत लावणे अनिवार्य आहे.
२. वय वर्षे ४५ ते त्यापुढील दिव्यांग व्यक्तींना संपूर्ण हयातीत सदर योजनेअंतर्गत जास्तीत जास्त १५ वर्ष लाभ घेता येईल.
३. अर्जदाराचे वय हे ४४ वर्ष पूर्ण असणे आवश्यक राहील.
४. मतिमंद व बहुअपंगत्व व्यक्तींना सर्व वयोगटामध्ये प्रथमतः प्राधान्य देण्यात येईल.
५. प्रती वर्षी प्रति अर्जदाराने आर्थिक वर्षामध्ये स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.
६. अर्जदार नोकरी अथवा उद्योग करत नसल्याचे स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

## योजना क्र. ४: दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांकरिता शिक्षण / प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य योजना

शाळांमध्ये विशेष विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकविताना विशेष पद्धतींचा अवलंब करावा लागतो. अशा विशेष पद्धतींचा अवलंब विद्यार्थ्यांच्या दैनंदिन व्यवहारात केल्यावरच त्यांचा विकास होऊ शकतो. दिव्यांग मुलांच्या संपूर्ण पुनर्वसनाकरिता पालक, विशेष शिक्षक, थेरपिस्ट (विशेष तज्ञ), समाज या सर्वांचाच सहभाग असावा लागतो. त्यातूनही विशेष मुलाच्या शिक्षणामध्ये पालकांची भुमिका सर्वात महत्वाची असते. पालकांनी आपल्या विशेष पाल्याच्या समस्या समजून घेणे, त्याच्या गरजा लक्षात घेणे व शालेय शिक्षणाचे अभ्यासपूर्वक निरिक्षण करून या विशेष पद्धतीं आत्मसात करणे आणि आपल्या पाल्याच्या दैनंदिन व्यवहारात त्याचा उपयोग करणे महत्वपूर्ण असते. या हेतूने शिक्षकांनी ठरवून दिलेल्या वेळेत पालकांनी सलग व टप्प्याटप्प्याने विविध शिक्षण व प्रशिक्षणाच्या उपक्रमांना, कार्यशाळांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. दिव्यांग क्षेत्रात काम करणा-या मान्यताप्राप्त शाळा, संस्था, राष्ट्रीय संस्थांचे दिव्यांग मुलांचे शिक्षण व पुनर्वसन यावर आधारित प्रशिक्षण आयोजित केलेल्या विविध कार्यशाळेस विशेष मुलांच्या पालकांनी उपस्थित राहून ज्ञान ग्रहण करणे आवश्यक आहे. सदरील आर्थिक सहाय्य मिळविण्याकरता पालकांनी दिव्यांग शिक्षण संबधित कार्यशाळेस उपस्थित राहणे, विशेष शाळेत वर्गनिरीक्षणासाठी उपस्थित राहणे

Scanned with CamScanner

आवश्यक आहे. एका पालकाला वर्षभरात कितीही वेळा वर्ग निरीक्षण व कार्यशाळेत उपस्थित राहता येईल तसेच एक किंवा अधिक प्रशिक्षण कार्यक्रमांत पालकांना सहभाग घेता येईल.

तक्ता क्र. १

| अ.क्र. | लाभार्थी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | वर्ग/ सत्र निरीक्षणाकरीता | रु. १००/- प्रतिदिन (आठवडयातून कमाल ४ दिवस) |
| २ | कार्यशाळेकरीता | कमाल रु. ५०००/- (प्रति कार्यशाळा) |
| ३ | दिव्यांगावर निगडीत असलेल्या शिक्षणा करीता (डी.एड/बी.एड./एम.एड./पीएच.डी.इ.समकक्ष शिक्षण तथा दिव्यांगासंबंधित १ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचे अभ्यासक्रम) | कमाल रु. ५०,०००/- (प्रति अभ्यासक्रम) |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांकरिता शिक्षण/प्रशिक्षण योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांकरिता शिक्षण / प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य योजनेचे अटी व शर्ती

(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

१. दिव्यांग विद्यार्थ्याच्या पालक/अर्जदाराने ज्या शाळेत शिक्षण घेत आहे त्या शाळेचे बोनाफाईड सर्टीफिकेट जोडणे अनिवार्य आहे
२. महिनाभर वर्ग निरीक्षण केल्याचा अथवा कार्यशाळेस हजर राहिल्याचे नाशिक महानगरपालिका समाज कल्याण विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या नमुन्यात संबधित शाळेच्या मुख्याध्यापक/ व्यवस्थापकांच्या स्वाक्षरीसहीत अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

योजना क्र. ५: दिव्यांगांसाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य योजना

दिव्यांग विद्यार्थी स्वतःच्या दिव्यांगत्वावर मात करण्याचा प्रयत्न करत जिद्दीने व चिकाटीने शिक्षण प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत असतो. नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील अत्यंत गरजू व होतकरू दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच विविध प्रकारचे व्यवसाय, लघुउद्योगांचे प्रशिक्षण घेण्याकरिता दिव्यांग विद्यार्थ्यांना द्यावी लागणारी फी देणेकरीता सदरील योजना प्रस्तावित करण्यात येते आहे. या याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. २

| अ.क्र. | लाभार्थ्यांचा तपशील | प्रति अर्जदार /प्रति वर्षी द्यावयाची रक्कम रू. |
|---|---|---|
| १ | बालवर्ग ते इयत्ता १२वी तथा समकक्ष वर्गामध्ये शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थी | २०,०००/- |
| २ | दिव्यांग मुले व व्यक्तींना शिक्षण व थेरपीकरीता आर्थिक सहाय्य रु.२५०/- प्रति सत्र (प्रति माह कमाल रु. २०००/- मात्र) | २४,०००/- |
| ३ | पदवी तथा समकक्ष विभागामध्ये शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थी | २५,०००/- |
| ४ | पदव्युत्तर पदवी तथा समकक्ष विभागामध्ये शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थी | ३०,०००/- |
| ५ | उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी (पीएचडी, एमफिल तथा समकक्ष विभागामध्ये शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थी) | ४०,०००/- |
| ६ | • व्यवसाय/लघुउदयोग/तांत्रिक/अभियांत्रिकी/वैद्यकीय शिक्षण घेणारे दिव्यांग विदयार्थ्यांच्या अभ्यासक्रमाची फी<br>• राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिडा क्षेत्रामध्ये भाग घेणारे खालील दिव्यांग विद्यार्थी तथा व्यक्ती:<br>१. शासकीय तथा शासनमान्य शाळा,महाविद्यालय व संस्थामध्ये शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थी तथा व्यक्ती | कमाल ५०,०००/- पर्यंत |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | लाभार्थ्यांचा तपशील | प्रति अर्जदार /प्रति वर्षी द्यावयाची रक्कम रु. |
|---|---|---|
| | २. नोकरी तथा व्यवसाय करणारे दिव्यांग व्यक्ती<br>३. केंद्र शासनाचा लोकसेवा आयोग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी पुर्वतयारीकरीता स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम देणे. | |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार लाभार्थ्यांस दिव्यांगांसाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षण योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

दिव्यांगांसाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य योजनेचे अटी व शर्ती
(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

१. सदर योजनेतर्गत अर्जदार शासकीय अथवा शासनमान्य असलेल्या संस्थेत शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे. किंवा RCI, MCI,महाराष्ट्र कौन्सिल फॉर OT/PT मार्फत नोंदणीकृत तज्ञ व्यक्तीकडे प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे.
२. तसेच शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असल्याबाबतचे बोनाफाईड सर्टीफिकेट किंवा तज्ञ मार्गदर्शकाचे त्यांच्या लेटरहेडवर प्रमाणित करुन प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.तक्त्यामधील मुद्दा क्र.०२ च्या आर्थिक सहायकरीता लाभार्थ्याने नोंदणीकृत असलेल्या तज्ञ (Rehab Professional) व्यक्तींकडून प्रशिक्षण घेत असलेले प्रमाणपत्र त्यांच्या नोंदणीकृत असलेल्या प्रमाणपत्रासहीत सादर करणे.

योजना क्र. ६: दिव्यांगांना सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य.

दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वावर मात करुन त्यांचे आयुष्य स्वावलंबी बनविण्याकरीता चलनवलन साहित्यांची नितांत आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे साधनांचा समावेश आहे. परंतु उत्तम दर्जाचे चलनवलन साहित्य व सहाय्यक उपकरणे आर्थिक दृष्टया दिव्यांग व्यक्तींना परवडत नाहीत. याकरीता उपरोक्त साहित्य खरेदी करण्याकरीता खाली नमुद केल्यानुसार आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे. या बाबींचा विचार करता दिव्यांगांकरीता सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य योजना राबविण्यात यावी.

१. अंध व्यक्तींसाठी संगणक (जॉस सॉफ्टवेअर), ब्रेल नोट वेअर, Communcation equipment Braille attachement telephone,adapeted walkers, ब्रेल लेख साहित्य, ब्रेल टाईपरायटर, टॉकींग टाईपरायटर, लार्ज प्रिंट बुक, अल्पदृष्टी अपंगत्वावर मात करणेसाठी Digital magnifiers Smart Cane इत्यादी
२. कर्णबधिर व्यक्तींसाठी: विविध प्रकारची वैयक्तीक श्रवणयंत्रे (बीटीईसह), शैक्षणिक संच, संवेदन उपकरणे, संगणकासाठीचे सहाय्यभूत उपकरणे.
३. अस्थिव्यंग व्यक्तींसाठी: Adopted Scutoor, कॅलीपर्स, व्हीलचेअर, तीनचाकी सायकल, स्वयंचलित तीन चाकी सायकल, कुबडया, कृत्रीम अवयव, प्रोस्थोटिक ॲण्ड नील वॉकी ब्रेस, डिव्हायसेस फॉर डेली लिव्हींग.
४. मतिमंद व्यक्तींसाठी: मतिमंदासाठी शैक्षणिक साहित्य (MR kits), बुध्दीमत्ता चाचणी संच, सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभूत साधने.
५. बहुविकलांग व्यक्तींसाठी: संबधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभूत साधने व उपकरणे, सी.पी.चेअर, स्वयंचलित सायकल व खुर्ची, संगणक वापरण्यासाठीची सहाय्यभूत उपकरणे.
६. कुष्ठरोग मुक्त दिव्यांग व्यक्ती: कुष्ठरोगमुक्त दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव व साधने, सर्जीकल ॲण्ड करेक्टीव्ह फूटवेअर्स, सर्जीकल अप्लायंसेस, मोबिलिटी एड इ.

उपरोक्त नमूद केलेल्या साहित्य किंवा त्याऐवजी इतर दिव्यांग सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञानाकरीता कमाल रु. ४०,०००/- (अक्षरी चाळीस हजार रुपये मात्र) पर्यंत अर्थसहाय्य मंजुर करण्यात यावे.

Scanned with CamScanner

दिव्यांगांना सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य योजनेचे अटी व शर्ती

(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

१. अर्जदार/दिव्यांगाचे पालकांनी चलनवलन साहित्याच्या आवश्यकतेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२. पात्र अर्जदारास ०७ वर्षातून एकदा सदर योजनेचा लाभ मिळेल.

योजना क्र. ७: विशिष्ट गरजा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरीता योजना.

दिव्यांगाच्या गरजा व समस्या लक्षात घेऊन नाशिक महानगर पालिका समाज कल्याण विभागामार्फत अभ्यासपूर्ण विविध दिव्यांग योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. मात्र वरील योजने व्यतिरिक्त नाशिक मनपा हद्दीतील दिव्यांग विद्यार्थी व्यक्तींना आवश्यकतेप्रमाणे मदत करण्याच्या दृष्टीकोनातून अशा व्यक्तीगत दिव्यांगांचा समावेश या योजनेअंतर्गत करण्यात यावा.त्यात खालील प्रकारच्या बाबींचा समावेश करण्यात यावा.

१. दिव्यांगांकरिता विवाह योजना.
२. दिव्यांग व्यक्तीस दिव्यांगत्वाच्या अनुषंगाने त्याचे घर, इमारत व परिसर यामध्ये अडथळा मुक्त करण्याकरीता आर्थिक सहाय्य देण्यात येईल.
३. व्यंग सुधार शस्त्रक्रियांसाठी अर्थसहाय करणे.
४. अपंग व्यक्तींना दुर्धर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी अर्थसहाय देणे. उदा. कॅन्सर, क्षयरोग, मेंदूचे विकार,ह्दय शस्त्रक्रिया इ.
५. मतिमंद व्यक्तींकरीता नॅशनल ट्रस्टमार्फत राबविण्यात येणाऱ्या निरामय तथा तत्सम विमा योजनांचे हप्ते भरणे.
६. दिव्यांग व्यक्तींच्या घराकरीता सोलर कंदील, सौरबंब, सौरचूल, बायोगॅस प्लांट, नळ जोडणी तसेच विद्युत जोडणीकरीता आर्थिक सहाय देणे.
७. दिव्यांग विद्यार्थ्यांना गणवेष तसेच विशेष/शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याकरीता आर्थिक सहाय्य देणे.
८. दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व समावेशक शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याकरीता त्यांच्या मदतनिसांना मदतनिस भत्ता देणे.
९. अपंग महिलांसाठीच्या सक्षमीकरणाच्या योजनांना अर्थसहाय देणे.
१०. दिव्यांग विद्यार्थ्यांना वाचक व लेखनिकासाठी अर्थसहाय पुरविणे.
११. कर्णबधिरांसाठी दुभाषकांची व्यवस्था करणे.
१२. मतिमंदासाठी कायमस्वरुपी औषधोपचारांची गरज आहे त्यांना मोफत औषध पुरविणे.
१३. कुष्ठरुग्णांसाठी औषधे/ड्रेसिंग तसेच सहायभूत साधने व सर्जिकल अप्लायसेंस पुरविणे.
१४. योजना क्र.७ मधील १ ते १३ योजनां व्यतिरिक्त जर दिव्यांग मुल तथा व्यक्तीस विशिष्ट गरज असल्यास सदरची बाब ही विशेष बाब म्हणून त्यास आर्थिक सहाय्य करण्यात येईल. उपरोक्त योजनांतर्गत अर्जदारास सविस्तर नाशिक महानगरपालिका समाज कल्याण विभागाकडे विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील. सदरच्या प्रस्तावावर मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने सर्व अटीशर्तीच्या अधिन राहून लाभ देण्यात येईल. यासाठी उपरोक्त दिव्यांग योजनांतर्गत प्रत्येकी अपंग मुले व व्यक्तींना कमाल रक्कम रुपये १,००,०००/-(अक्षरी एक लाख रुपये मात्र) पर्यत विशिष्ट गरजा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरीता योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात यावे.

विशिष्ट गरजा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरीता योजना या योजनेचे अटी व शर्ती.

(सर्व योजनांकरीता लागू करण्यात आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमुद करण्यात आलेल्या अटी शर्ती उपरोक्त योजनेस लागू राहतील)

१. उपरोक्त १ ते १४ योजनांमधील संबधित योजनेकरीता दरपत्रक जोडणे आवश्यक
२. उपरोक्त १ ते १४ योजनांमधील संबधित योजनेकरीता वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला जोडणे आवश्यक
३. उपरोक्त १ ते १४ योजनांमधील संबधित योजनेकरीता विमा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक

Scanned with CamScanner

४. उपरोक्त १ ते १४ योजनांमधील संबधित योजनेकरीता संस्था/संघटना/व्यक्ती नोंदणीकृत दाखला/ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक
५. सदर योजनेतर्गत अर्जदार शासकीय अथवा शासनमान्य असलेल्या संस्थेत शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे. किंवा RCI,MCI, महाराष्ट्र कौन्सिल फॉर OT/PT मार्फत नोंदणीकृत तज्ञ व्यक्तीकडे प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे.
६. तसेच शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असल्याबाबतचे बोनाफाईड सर्टीफिकेट किंवा तज्ञ मार्गदर्शकाचे त्यांच्या लेटरहेडवर प्रमाणीत करुन प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.
७. सदर योजनेअंतर्गत संपूर्ण हयायातीत जास्तीत जास्त ०५ प्रकारच्या योजनांमध्ये लाभ घेता येईल.

**योजना क्र. ८ नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था/संघटनांचे सक्षमीकरण करणे**

अपंगासाठी किमान ३% निधी योग्य प्रयोजनार्थ खर्च कशा प्रकारे करण्यात यावा याकरीता नगर विकास विभाग यांचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दिनांक २८/१०/२०१५ व ग्राम विकास विभाग यांचा शासन निर्णय क्र.अपंग२०१५/प्र.क्र.१३७/वित्त-३,दि.२४/११/२०१५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थानी अपंग व्यक्तींकरीता राखून ठेवण्यात आलेल्या ३% निधी मधून अपंग हिताच्या कोणकोणत्या योजना राबविण्यात याव्यात याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संबधित समित्यांना सामुहीक योजनांतर्गत खालील बाबी सुचित करण्यात आलेले आहेत.

१. दिव्यांग महिला बचत /स्वयंसहायता गटांना सहायक अनुदान देणे.
२. सर्व प्रवर्गाच्या अतितीव्र दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी तात्पुरत्या अथवा कायम स्वरुपाचा निवारागृहाला सहायक अनुदान देणे.
३. लवकरात लवकर त्वरीत उचाराच्या दृष्टीने अपंगांच्या पुर्व प्राथमिक शिक्षणाची (Early Detection & Intervention Center) सुविधा पुरविण्याऱ्या संस्थाना अर्थसहाय उपलब्ध करुन देणे.
४. दिव्यांगा व्यक्तींना समुपदेशन तसेच सल्लामसलत करणाऱ्या केंद्राना सहायक अनुदान देणे.
५. दिव्यांग मुलांकरीता विशेष शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या संस्थाना सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देणे.
६. दिव्यांग मुलांच्या पालक संघाना/ संघटनांना सहायक अनुदान देणे.

दिव्यांग संस्था/ पालक संघटना यांना लागणाऱ्या सहाय्यक अनुदानाबाबत सविस्तर प्रस्ताव नाशिक महानगरपालिका केंद्राकडे सादर करण्यात यावा. सदरच्या प्रस्तावावर मा. आयुक्त सो यांच्या मार्गदर्शनाखाली नियमावली तयार करुन पात्र अथवा अपात्र करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत असते. तसेच प्रतिवर्ष अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून मर्यादित संस्था/ संघटनांना अनुदान देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था/ संघटनांचे सक्षमीकरण करणे या योजनेचे अटी व शर्ती**

१. दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था/ संघटना या नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.
२. दिव्यांग संस्था केंद्र/ राज्य सरकारांतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.
३. पालक संघटना हे चॅरीटी कमीशनर/केंद्र/राज्य सरकारांतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.
४. दिव्यांग संस्था/संघटना हे दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्याचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.
५. शिक्षण, प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाना कमाल ०३ लाख व पालक / दिव्यांग संघटनांना कमाल ०१ लाख रुपये सहाय्यक अनुदान प्रस्तावित प्रकल्पाकरीता देण्यात येईल.
६. पाच वर्षातून एकदाच सहाय्य अनुदान देण्यात येईल.
७. दिव्यांग संस्था/ संघटना यांच्यावर केंद्र/राज्य/पोलीस ठाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आरोपपत्र दाखल झाली नाही याबाबतचे स्वयं घोषणापत्र देणे बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

८. नाशिक महानगरपालिका, नाशिक समाज कल्याण विभागा मार्फत देण्यात येणारे आर्थिक सहाय हे नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील वारतव्य करणारे दिव्यांग मुले तथा व्यक्तींकरीताच उपयोगात आणण्याबाबतचे स्वयं घोषणापत्र संस्थानी सादर करणे बंधनकारक आहे.

९. संस्थानी ज्या प्रकल्पाकरीता सहाय्यक अनुदान प्रस्तावित केले आहे ते अंदाजपत्रकीय वर्ष योग्य नियोजनाव्दारे व त्याबाबतची अंमलबजावणी करुन प्रस्तावित प्रकल्पावरच खर्च करणे बंधनकारक आहे.

१०. प्रस्तावित प्रकल्पाकरीता नाशिक महानगरपालिका, नाशिक समाज कल्याण विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या नियमावलीमध्ये फेरबदल करणे,पालन न करणे किंवा गैरव्यवहार करणे इ.बाबी निदर्शनास आल्यास मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्यामार्फत संबधित संस्था/ संघटना यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यात येईल तसेच प्रदान करण्यात आलेल्या सहाय्यक अनुदान हे व्याजासहीत वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

११. दिव्यांग संस्था/संघटना यांच्याकडून आलेल्या प्रस्तावाची निवड करण्याचे अधिकार मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्या अधिकारात राखून ठेवण्यात येत आहे.

सदर योजना राबविण्यासाठी उपरोक्त महासभा ठरावातील मंजुरीनुसार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे शासकीय समिती (Governing Council) स्थापन करणेत येत आहे,

<u>शासकीय समिती (Governing Council)</u>

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त | अध्यक्ष |
| २. | उपआयुक्त (समाजकल्याण) | सदस्य,सचिव |
| ३. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सदस्य |
| ४. | शहर अभियंता | सदस्य |
| ५. | अधिक्षक अभियंता (सार्व.आरोग्य अभि. | सदस्य |
| ६. | अधिक्षक अभियंता (वियुत व यांत्रिकी ) | सदस्य |
| ७. | शिक्षण अधिकारी, नामनपा | सदस्य |
| ८. | वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी | सदस्य |

या उपरोक्त समितीस सदर योजनांची जलद गतीने अंमलबजावणी करणे करीता तांत्रिक सहाय्य करणे साठी तज्ञांची आवश्यक्ता असल्याने प्राप्त अर्जाची छाननी करुन स्वयंमस्पष्ट अभिप्रायसह प्रस्ताव पुढील कार्यवाही करीता शासकीय समिती (Governing Council) कडेस सादर करणे कामी खालील प्रमाणे छाननी समिती स्थापित करण्यात येत आहे.

<u>छाननी समिती</u>

१) श्रवण व वाचा तज्ञ

२) मानसोपचार तज्ञ

३) अस्थिव्यंग तज्ञ

४) नेत्र तज्ञ

छाननी अंती पात्र ठरलेल्या अर्जदारांना / लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ म्हणुन दयावयाच्या सर्व रक्कमा थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा करण्यात याव्यात. मात्र ज्या लाभार्थ्यांना वैद्यकिय उपचारासाठी अर्थ सहाय्य देण्यात येणार आहे त्या बाबतची रक्कम थेट वैद्यकिय उपचार करणा-या संस्थेच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावी.

सदरच्या विविध योजने करीता उपलब्ध असलेल्या तरतुदी पेक्षा जास्त पात्र प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रथम येईल त्यास प्राधान्य देऊन उर्वरीत पात्र अर्जांची प्राधान्य क्रमानुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. तरतुद उपलब्ध झाल्या नंतर या योजनेंचा लाभ देणे बाबत उचित कार्यवाही करावी.

सदर योजनांची अंमलबजावणी दरवर्षीच्या अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार करण्यात यावी.

(तुकाराम मुंढे)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक

Scanned with CamScanner

नाशिक महानगरपालिका,नाशिक
जा.क्रं./सकवि/कार्या-१/ ५० /२०१९
दिनांक ०८/०२/२०१९

## प्रशासकीय मान्यता आदेश

**विषय :-** नाशिक महानगरपालिका हददीतील वय १० वर्ष पुर्ण झालेल्या मतिमंद/मेंदू पिडीत तसेच बहुविकलांग जे ७० ते १०० टक्के दिव्यांग आहेत व पूर्णत: अंथरुणास खिळून आहेत अशा दिव्यांग व्यक्तींना अर्थसहाय्य योजना सुरु करणे बावत.

**संदर्भ :-** १)मा.शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२०दि.२८/१०/२०१५
२)मा.शासन निर्णय क्रंक.अपंग-२०१५/प्र.क्रं.१३७/वित्त-३ दि.२४/११/२०१५
३)महासभा ठराव क्रमांक २० दिनांक १९/७/२०१८
४) मा.आयुक्त सो.यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्रं.नामनपा/सकवि/कार्या-१/९१/२०१८ दिनांक १६/८/२०१८
५)महासभा ठराव क्रमांक २८९ दिनांक १९/१/२०१९

संदर्भ क्रमांक १ व २ चे शासन निर्णयातील दिव्यांग व्यक्तींकरिता राखून ठेवण्यांत आलेल्या निधीतून राबवायाच्या कल्याणकारी योजने संदर्भातील मार्गदर्शक् सूचनानुसार नाशिक महानगर पालिका क्षेत्रातील दिव्यांगांकरिता कल्याणकारी योजना राबविण्यास संदर्भातील ३ व ४ च्या अन्वये मान्यता देण्यांत आली आहे त्यानुसार सदर योजनांची अंमलबजावणी सुरु करण्यांत आली आहे. मात्र सदर योजनांची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर मतिमंद/मेंदूपिडीत/बहुविकलांग दिव्यांग जे ७० ते १०० टक्के दिव्यांग आहेत व पूर्णत: अंथरुणास खेळून आहेत अशा दिव्यांगांना कोणत्याही प्रकारचे काम करता येत नाही व ते पूर्णत: दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून असतात अशा दिव्यांगांसाठी संदर्भीय ३ व ४ अन्वये सुरु केलेल्या योजनामध्ये योजना क्रमांक ३ प्रमाणे दरमहा अर्थसहाय्य देणेबाबतची मागणी विविध दिव्यांग संघटना व अशा दिव्यांगांच्या पालकांकडून वारंवार होत होती. अशा दिव्यांगांना मदत करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन नाशिक महानगरपालिका हददीतील वय १० वर्ष पुर्ण झालेल्या मतिमंद/मेंदू पिडीत तसेच बहुविकलांग जे ७० ते १०० टक्के दिव्यांग आहेत व पूर्णत: अंथरुणास खिळून आहेत अशा दिव्यांग व्यक्तींना अर्थसहाय्य योजना सुरु करणे बाबत तसा प्रस्ताव मा.महासभेवर जा.क्र.नस/सकवि/२२ दिनांक १८/१/२०१९ अन्वये महासभेच्या प्रशासकीय व धोरणात्मक मंजुरीसाठी ठेवला असता सदर प्रस्तावास महासभा ठराव क्रमांक २८९ दिनांक १९/१/२०२१ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

संदर्भिय १ व २ चे शासन निर्णय तसेच संदर्भातील क्रमांक ३ व ४ चे मंजुरी तसेच संदर्भातील ५ चे ठरावातील प्रशासकीय व धोरणात्मक मंजुरी विचारात घेऊन यापूर्वी सुरु केलेल्या १ ते ८ कल्याणकारी योजने बरोबरच खालील प्रमाणे दिव्यांगांसाठी योजना क्रमांक ९ नाशिक महानगरपालिका हददीतील वय १० वर्ष पुर्ण झालेल्या मतिमंद/मेंदूपिडीत तसेच बहुविकलांग जे ७० ते १०० टक्के दिव्यांग आहेत व पूर्णत: अंथरुणास खिळून आहेत अशा दिव्यांगांना अर्थसहाय्य योजना खालील अटीशर्तीस अधिन राहून कायमस्वरुपी प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार राबविण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

**योजना क्रमांक ९ :-** मतिमंद/मेंदू पिडीत तसेच बहुविकलांग जे ७० ते १०० टक्के दिव्यांग आहेत व पूर्णत: अंथरुणास खिळून आहेत अशा दिव्यांग व्यक्तींना अर्थसहाय्य योजना

समाजातील प्रत्येक व्यक्ती संपूर्ण स्वालंबी असावी ही मुलभूत संकल्पना आहे पंरतू नैसर्गिकरित्या आलेल्या शारीरीक मर्यादा व एक विशिष्ठ मर्यादापलिकडे न येणाऱ्या स्वालंबत्व यामुळे कित्येक व्यक्तींना समाजामध्ये दुसऱ्या व्यक्तींवर अवलंबून रहावे लागते. मुख्यत: मतिमंद/मेंदू पिडीत तसेच बहुविकलांग ७० ते १०० टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तींना नैसर्गिक मर्यादामुळे अथक प्रयत्नानंतरही स्वत:चे चरित्रार्थ चालविण्याकरिता असमर्थ ठरतात अशा व्यक्तींना स्वयंम रोजगारही करता येत नाही किंवा नोकरीही करु शकत नाही. त्यांना त्यांचे स्वत:चे कामे देखील स्वत:ला करता येत नाही अशा दिव्यांग व्यक्तींचा विचार करता अशा प्रकारे दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना प्रतिमहा र.रु.२०००/- याप्रमाणे प्रति वर्षे र.रु.२४,०००/- आर्थिक सहाय्य देण्याची योजना लागू करणेंत येत आहे योजनेच्या अटीशर्ती खालील प्रमाणे आहे.

### अटी व शर्ती

(महासभा ठराव क्रमांक २० दिनांक १९/७/२०१८ अन्वये मंजूर करणेंत आलेल्या दिव्यांग योजनाकरिता लागू करणेंत आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमूद केलेल्या अटीशर्ती उपरोक्त योजनेस लागू रहातील.)

१) अर्जदारास तहसिलदार यांचेमार्फत देण्यांत येणाऱ्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

Scanned with CamScanner

२) वय वर्षे १० च्या पुढील वयोगटातील मतिमंद/मेंदू पिडीत असणाऱ्या तसेच बहुविकलांग जे ७० ते १०० टक्के दिव्यांग आहेत व पूर्णत: अंथरुणास खिळून आहेत अशा दिव्यांग व्यक्तींना सदर योजनेचा लाभ देणेत येईल.

३) अर्जदाराचे वय १० वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक अर्जदाराने प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

५) अर्जदार नोकरी किंवा उद्योग करीत नसल्याबाबतचे स्वयंम घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६) अर्जदाराने महानगरपालिकेने तयार केलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज भरुन सदरचा अर्ज रजिष्टर पोष्टाव्दारे सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची योजना संदर्भातील क्रमांक ४ ते प्रशासकीय मान्यता आदेशात नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी करणेंत यावी. सदरच्या योजनेकरिता उपलब्ध असलेल्या तरतूदीपेक्षा जास्त पात्र प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रथम येईल त्यास प्राधान्य देऊन उर्वरित पात्र अर्जदारांची प्राधान्य क्रमांनुसार प्रतिक्षायादी तयार करणेंत यावी. तरतूद उपलब्ध झाल्यानंतर या योजनेचा लाभ देणेबाबत उचित कार्यवाही करावी. सदर योजनेची अंमलबजावणी दरवर्षीच्या अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून करणेंत यावी.

सदरचा खर्च "अंध अपंग या लेखाशिर्षकातून भागविण्यांत यावा.

आयुक्त,

नाशिक महानगरपालिका,नाशिक

Scanned with CamScanner

नाशिक महानगरपालिका,नाशिक
जा.क्र.नामनपा/सकवि/कार्या-१/०४ /२०२०
दिनांक : ०२/०१/२०२०

## प्रशासकीय मान्यता आदेश

**विषय: दिव्यांग कल्याणकारी योजनांच्या अटी शर्ती शिथिल करणे बाबत**

संदर्भ: १.महासभा ठराव क्रमांक २० दिनांक १९/०७/२०१८
२.प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक नामनपा/सकवि/कार्या-१/९१/२०१८ दिनांक १६/०८/२०१८
३.महासभा ठराव क्रमांक २८९ दिनांक १९/०१/२०१९
४.प्रशासकीय मान्यता आदेश् क्रमांक सकवि/कार्या-१/५०/२०१९ दिनांक ०६/०२/२०१९
५.महासभा ठराव क्रमांक ४६० दिनांक २५/०६/२०१९
६.प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक नामनपा/सकवि/कार्या-०/२८८/२०१९ दिनांक ०९/०९/२०१९
७.महासभा ठराव क्रमांक २० दिनांक २०/१२/२०१९

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांकरीता संदर्भिय १ ते ६ चे महासभा ठराव व प्रशासकीय मान्यता आदेशान्वये १ ते १० कल्याणकारी योजना सुरु करण्यात आलया आहेत.त्यानुसार सदर योजनांची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे.उक्त योजनांमधील योजना क्रमांक ३ चा लाभ घेणेकरीता दिव्यांग अर्जदाराचे वय ४४ पुर्ण असणे आवश्यक आहे अशी अट आहे.तसेच १ ते १० योजनांसाठी असलेल्या समांतर अटीशर्तीतील अट क्रमांक ८ मध्ये योजनांचा लाभ मिळणेकरीता अर्जदारास इतर कोणत्याही शासकिय,निमशासकीय तसेच मनपा मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग योजनेचा लाभ घेत नाही किंवा घेणार नाही अश्या स्वरुपाचे स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.सदरच्या अटीशर्ती शिथील करणेबाबत विविध दिव्यांग संघटनांची व दिव्यांगांची मागणी होती.सदर मागणीचा विचार करता तसा प्रस्ताव मा.महासभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला असता त्यास महासभा ठराव क्रमांक २० दिनांक २०/१२/२०१९ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

संदर्भिय क्रमांक ७ चे ठरावातील धोरणात्मक मंजुरी विचारात घेवुन संदर्भिय १ ते ६ अन्वये सुरु करण्यात आलेल्या दिव्यांग कल्याणकारी योजनांमधील योजना क्रमांक ३ व सर्व योजनांतील समांतर अटीशर्ती मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत असुन सदर दुरुस्ती नुसार कार्यवाही करण्यास या आदेशान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

योजना क्रमांक ३: प्रौढ बेरोजगार अर्थसहाय्य योजना या योजनेतील अट क्रमांक ३ मध्ये अर्जदाराचे वय ४४ वर्ष पुर्ण असणे आवश्यक राहील या ऐवजी अर्जदाराचे वय हे वय वर्ष ४० पुर्ण असणे आवश्यक राहील असे दुरुस्ती करण्यात येत आहे

दिव्यांगांच्या सर्व योजनांसाठी समांतर अटी शर्ती या अटीशर्तीमधील योजना क्रमांक ८नुसार स्वयंघोषणापत्र दाखल केले असेल व सदर अर्जदार हा संजय निराधार योजनेचा लाभ घेत असला तरी अश्या लाभार्थ्यास नाशिक महानगरपालिकेच्या **एकाच योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील**.अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे अटीशर्ती मधील करण्यात आलेली दुरुस्ती विचारात घेवुन सदर दुरुस्ती नुसार दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत लाभ देणे बाबत कार्यवाही करण्यास या आदेशान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

02.01.20

राधाकृष्ण गमे
आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक

Scanned with CamScanner

नाशिक महानगरपालिका,नाशिक
जा.क्रं./नामनपा/सकवि/कार्या-१/२८८/२०१९,
दिनांक ०३/०९/२०१९

**प्रशासकीय मान्यता आदेश**

विषय :- नाशिक महानगरपालिका हददीतील दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य/शिष्यवृत्ती योजना सुरु करणेबाबत

संदर्भ :- १) महासभा ठराव क्रमांक २० दिनांक १९/७/२०१८
२) मा.आयुक्त सो.यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्रं.नामनपा/सकवि/कार्या-१/९१/२०१८ दिनांक १६/८/२०१८
३) महासस्भा ठराव क्रमांक २८९ दिनांक १९/१/२०१९
४) मा.आयुक्त् सो. यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्रं.सकवि/कार्या-१/५०/२०१९ दि.६/२/१९
५) महासभा ठराव क्रमांक ४६० दि.२५/६/२०१९

मा.शासनाचे शासन निर्णय क्रं.सकीर्ण-२०१५/प्र.क्रं.११८/नवि-२० दिनांक २८/१०/२०१५ व शासन निर्णय क्रं.अपंग२०१५/प्र.क्रं.१३७/वित्त-३ दिनांक २४/११/२०१५ मध्ये दिव्यांग व्यक्तींकरिता राखून ठेवण्यांत आलेल्या निधीतून राबवायाचा कल्याणकारी योजना संदर्भात मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनानुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांकरिता संदर्भिय १ ते ४ अन्वये नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांसाठी १ ते ९ कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरु करणेंत आलेली आहे. मात्र दिव्यांग खेळाडूकरिता कोणतीही योजना नसल्याने दिव्यांग खेळाडूंना प्रोत्साहित करणेकरिता व विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या दिव्यांग खेळाडूंकरिता कल्याणकारी योजना नसल्याने विविध संघटनांकडून व दिव्यांगांच्या पालकांकडून दिव्यांग खेळाडूंसाठी अर्थसहाय्य देणेबाबतची मागणी करणेंत येत होती. याबाबीचा विचार करुन नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग खेळाडूंना व अशा दिव्यांग खेळाडूंनी राज्यस्तरावर,राष्ट्रीय स्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिडा प्रकारामध्ये विशेष प्राविण्य मिळूनप्रथम,व्दितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे अशा खेळाडूंसाठी अर्थसहाय्य/शिष्यवृत्ती सुरु करणेबाबत तसा प्रस्ताव मा.महासभेवर मान्यतेसाठी ठेवला असता त्यास महासभा ठराव क्रमांक ४६० दिनांक २५/६/२०१९ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

संदर्भीय क्रमांक ५ मधील ठरावातील प्रशासकीय व धोरणात्मक मंजुरी विचारांत घेऊन यापूर्वी संदर्भिय १ ते ४ अन्वये सरु केलेल्या १ ते ९ कल्याणकारी योजनेबरोबरच खालील प्रमाणे दिव्यांग खेळाडूंसाठी योजना क्रमांक १० दिव्यांग खेळाडू ज्यांनी क्रिडा स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले आहे किंवा जे खेळाडू विविध क्रिडा स्पर्धाकरिता परदेशात होणाऱ्या क्रिडा स्पर्धेसाठी सहभागी होत आहेत अशा दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य योजना खालील अटीशर्तीस अधिन राहून कायमस्वरुपी प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार राबाविण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

**योजना क्रमांक १०:- दिव्यांग खेळाडू ज्यांनी क्रिडा स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले आहेत किंवा जे खेळाडू विविध क्रिडा स्पर्धाकरिता परदेशात होणाऱ्या क्रिडा स्पर्धेसाठी सहभाग नोंदवू इच्छितात अशा दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य योजना**

समाजात प्रत्येक व्यक्ती संपूर्ण स्वालंबी असावी ही मुलभूत संकल्पना आहे परंतू नैसर्गिकरित्या आलेल्या शारीरीक मर्यादा व एक विशिष्ठ मर्यादापलिकडे न येणारे स्वालंबत्व यामुळे कित्येक व्यक्तींना समाजामध्ये दुसऱ्या व्यक्तींवर अवलंबून रहावे लागते. मुख्यत: जे दिव्यांग खेळाडू क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग नोंदवून त्यांचे अपंगात्वर मात करत विविध खेळांमध्ये जिल्हास्तरीय,राज्यस्तरीय,राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष प्राविण्य मिळविलेले आहेत तसेच काही खेळाडू विविध क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी परदेशामध्ये अंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवित असतात अशा खेळाडूंना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. तसेच अशा दिव्यांग खेळाडूंची आर्थिक परिस्थिती देखील हालाखीची असते पैसे अभावी विविध क्रिडा स्पर्धेमध्ये त्यांना सहभाग नोंदवून विशेष प्राविण्य मिळविणेकामी अडचण निर्माण होत असतात याकरिता त्यांना आर्थिक सहाय्य देऊन प्रोत्साहित करणे आवश्यक वाटते. त्याकरिता अशा खेळाडूंना खालील अटीशर्तीवर विशेष अर्थसहाय्य देणेबाबत प्रस्तावित करणेंत येत आहे.

| अ.क्र. | प्राविण्य | वार्षिक क्रीडा शिष्यवृत्ती रक्कम रु. | | |
|---|---|---|---|---|
| | | आंतरराष्ट्रीय स्तर | राष्ट्रीय स्त्र | राज्य स्तर |
| १ | प्रथम क्रमांक | १,००,०००/- | २५,०००/- | १०,०००/- |
| २ | द्वितीय क्रमांक | ७५,०००/- | २०,०००/- | ७०००/- |
| ३ | तृतीय क्रमांक | ५०,०००/- | १५,०००/- | ५०००/- |
| ४ | मान्यता प्राप्त अधिकृत अंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागाकरिता | प्रत्यक्ष येणारा खर्च किंवा तीन लक्ष यापैकी जी रक्कम कमी असेल ती | | |

Scanned with CamScanner

## अटी व शर्ती

(महासभा ठराव क्रमांक २० दिनांक १९/७/२०१८ अन्वये मंजूर करणेंत आलेल्या दिव्यांग योजनाकरिता लागू करणेंत आलेल्या समांतर अटी व शर्ती व्यतिरिक्त खालील नमूद केलेल्या अटीशर्ती उपरोक्त योजनेस लागू रहातील.)

१) सदर अर्थसहाय्य हे भारतीय ऑल्म्पीक /प्यारा ऑल्म्पीक समितीची मान्यता असलेल्या अथवा स्पोर्टर्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया (स्पोर्टस मिनीस्ट्री) यांचे मान्यता असलेल्या खेळ प्रकाराकरिता लागू राहील.

२) सदरचे अर्थसहाय्य हे महाराष्ट्र शासन क्रिडा व युवक सेवा संचालनालयामार्फत आयोजित करणेंत येत असलेल्या मान्यता प्राप्त अधिकृत खेळाच्या शालेय/राज्यस्तरीय/राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धामध्ये प्राविण्य प्राप्त दिव्यांग खेळाडूकरिता तसेच वरीलप्रमाणे मान्यताप्राप्त अधिकृत अंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग नोंदविणाऱ्या दिव्यांग खेळाडूकरिता लागू राहील.

३) शासन मान्यताप्राप्त अधिकृत खेळाच्या असोसिएशन/संघटनाव्दारे आयोजित करणेंत येणाऱ्या जिल्हा / राज्य / राष्ट्रीय / अंतरराष्ट्रीय अंजिक्य पद निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होऊन प्राविण्य (प्रथम,व्दितीय व तृतीय क्रमांक)प्राप्त दिव्यांग खेळाडू करिताच सदरचे अर्थसहाय्य लागू राहील.

४) जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/अंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या तसेच अंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या /झालेल्या दिव्यांग खेळाडूस एका वर्षामध्ये एकदाच अर्थसहाय्य देय राहील.

५) नाशिक महानगरपालिकेच्या इतर कल्याणकारी योजने अंतर्गत अर्थसहाय्य/शिष्यवृत्ती मिळालेली असल्यास अशा क्रीडा पटटूंनी या योजने अंतर्गत अर्ज केल्यास त्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

६) सदर अर्थसहाय्याकरिता सादर करणेंत येणारे प्राविण्य प्रमाणपत्र व सबंधित असोसिएशनकडून विहीत नमुन्यात प्रमाणित करुन योग्य कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

७) सदरचे अर्थसहाय्य हे नाशिक महानगरपालिका कार्य क्षेत्रातील रहिवासी दिव्यांग खेळाडूकरिता लागू राहील. त्यासाठी किमान ५ वर्षे पासुन रहिवासी असल्याबाबतचा पुरावा म्हणुन आधारकार्ड, शिधी पत्रिका, मिळकत धारक असल्यास मागील ५ वर्षाची मालमत्ता कराची पावती,पाणीबिल,वीजबिल,मागील ५ वर्षाचा भाडेकरारनामा इत्यादी दस्तऐवज पुरावा म्हणुन सादर करणे आवश्यक राहील.

८) एखादया खाजगी/ वैयक्तीकरित्या आयोजित केलेल्या किंवा अंमत्रित/निमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेऊन मिळविलेल्या प्राविण्य प्रमाणाचा तसेच सहभागाचा विचार केला जाणार नाही.

९) अर्ज विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील. अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी,चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास सदरहू अर्जदार भविष्यात कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी अपात्र राहील. व त्याकडून देण्यांत आलेले अर्थसहाय्य वसुल केले जाईल.

१०) अपंग क्रिडा शिष्यवृत्ती मिळणेस खेळाडूस अनुदान मिळणेबाबत हक्क सांगता येणार नाही.

सदर योजनेची संदर्भ क्रमांक २ चे प्रशासकीय मान्यता आदेशात नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी करणेंत यावी. सदरच्या योजनेकरिता उपलब्ध असलेल्या तरतूदीपेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रथम येईल त्यास प्राधान्य देऊन उर्वरित पात्र अर्जदारांची प्राधान्य क्रमांनुसार प्रतिक्षा यादी तयार करणेंत यावी. तरतूद उपलब्ध झाल्यानंतर या योजनेचा लाभ देण्याबाबत उचित कार्यवाही करावी. सदर योजनेची अंमलबजावणी दरवर्षीच्या अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून करणेंत यावी. सदर योजनेचा खर्च दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविणे लेखाशिर्षक संगणक कोड ५०७८ यामधून करणेंत यावा.

८/६/१९

आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

Scanned with CamScanner

## नाशिक महानगरपालिका,नाशिक

जा.क्र.नामनपा/सकवि/कार्या-१/१४०/२०२० दिनांक :१०/०६/२०२०

### प्रशासकीय मान्यता आदेश

**विषय:-** दिव्यांगांसाठी सुरु करण्यात आलेल्या दिव्यांग कल्याणकारी योजना क्रमांक ०३ व योजना क्रमांक ०९ मधील अटीशर्ती मध्ये बदल करणे बाबत

**संदर्भ:** -१. महासभा ठराव क्रमांक २० दिनांक १९/०७/२०१८

२. प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक नामनपा/सकवि/कार्या-१/९१/२०१८ दिनांक १६/०८/२०१८

३. महासभा ठराव क्रमांक २८९ दिनांक १९/०१/२०१९

४. प्रशासकीय मान्यता आदेशक क्रमांक सकवि/कार्या-१/५०/२०१९ दिनांक ०६/०२/२०१९

५ .महासभा ठराव क्रमांक ४६० दिनांक २५/०६/२०१९

६..प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक नामनपा/सकवि/कार्या-१/२८८/२०१९ दिनांक १६/०८/२०१९

७.महासभा ठराव क्रमांक २० दिनांक २०/१२/२०१९

८. प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक नामनपा/सकवि/कार्या-१/०४/२०२० दिनांक ०२/०१/२०२०

९. महासभा ठराव क्रमांक १९ दिनांक २९/०५/२०२०

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांकरीता संदर्भिय १ ते ८ मधील ठराव व प्रशासकीय मान्यता आदेशान्वये १ ते १० दिव्यांग कल्याणकारी योजना सुरु करण्यात आल्या आहेत.सदर योजनांमधील योजना क्रमांक ०३ प्रौढ बेरोजगार अर्थसहाय्य योजना या योजनेतील अट क्रमांक ०५ व योजना क्रमांक ०९ मतिमंद/मेंदुपिडीत तसेच बहुविकलांग अश्या दिव्यांगांना अर्थसहाय्य योजना या योजनेतील अट क्रमांक ०४ नुसार प्रत्येक पात्र अर्जदाराने /लाभार्थ्याने प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे अशी अट नमुद केली आहे..

योजनेतील अटीशर्तीनुसार यापूर्वी ज्या अर्जदारांना अर्थसहाय्य मंजूर झाले आहे त्यांना दरवर्षी नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.तसे केल्यानंतरच अर्जाची छाननी करून छाननी समितीचा अभिप्राय घेवुन व शासकीय समितीचा अभिप्राय घेवुन मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने त्यांना पुन्हा अर्थसहाय्य सुरु करण्यात येते. या सर्व प्रक्रियेत अर्ज मंजुर होईपावेतो त्यांचे अर्थसहाय्य खंडीत होते.परंतु अशा या प्रक्रियेमुळे ज्यांना एक वर्षापुर्वी अर्थसहाय्य मंजुर केलेले आहे त्यांनी उशीरा अर्ज सादर केल्यास त्यांना काही महिन्यांचे अर्थ सहाय्यास मुकावे लागते.त्यामुळे यापुर्वी योजना क्र. ३ व योजना क्र. ९ अंतर्गत ज्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजुर करण्यात आले आहे.त्यांना पुढील वर्षी व दर वर्षी सलग अर्थसहाय्याचा लाभ खंडीत न करता अर्थसहाय्य चालु ठेवणे करीता योजना क्र. ३ मधील अट क्र. ५ व योजना क्रमांक ९ अट क्रमांक ४ मध्ये यापूर्वी ज्या अर्जदारांना अर्थसहाय्य मंजूर झाले आहे. त्यांचेकडून सध्याच्या अटीशर्तीनुसार दरवर्षी नव्याने अर्ज न घेता त्यांचेकडुन नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्य असल्याबाबतचे पुराव्या दाखल कागदपत्रे व हयातीचा दाखला घेवून सदरचे अर्थसहाय्य नियमित चालु ठेवणे.व त्याप्रमाणे अटीशर्तीत बदल करणे बाबत मा.महासभेच्या धोरणात्मक मंजुरीकरीता प्रस्ताव ठेवण्यात आला असता त्यास महासभा ठराव क्रमांक १९ दिनांक २९/०५/२०२० अन्वये नियमानुसार कार्यवाही करणेस मंजुरी देण्यात आली आहे.

महासभा क्रमांक १९ दिनांक २९/०५/२०२० ची मंजुरी विचारात घेता संदर्भिय ०१ ते ०४ अन्वये सुरु करण्यात आलेल्या दिव्यांग कल्याणकारी योजना क्रमांक ०३ प्रौढ बेरोजगार अर्थसहाय्य योजना व योजना क्रमांक ०९ मतिमंद/मेंदुपिडीत तसेच बहुविकलांग यांना अर्थसहाय्य योजना या योजनेतील खालील प्रमाणे अटी शर्ती मध्ये बदल करण्यात येत आहे..

**योजना क्र. ३ मधील अट क्र. ५ व योजना क्रमांक ९ मधील अट क्रमांक ४ मध्ये यापूर्वी ज्या अर्जदारांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले व यापुढे मंजुर करण्यात येणार आहे अशा लाभार्थ्यांकडुन सध्याच्या अटीशर्तीनुसार दरवर्षी नव्याने अर्ज भरुन न घेता त्यांचेकडुन नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्या बाबतचे पुराव्यादाखल कागदपत्रे व हयातीचा दाखला घेवून सदरचे अर्थसहाय्य दर वर्षी नियमित चालु ठेवणेस या आदेशान्वये मंजुरी देण्यात येत आहे.**

१०/६

राधाकृष्ण गमे

आयुक्त

नाशिक महानगरपालिका,नाशिक

प्रत :

१.अति.आयुक्त (शहर)

२.उपआयुक्त (समाज कल्याण)

३.आदेश फाईल ४.स्थळ प्रत

Scanned with CamScanner